शिवराज शिक्षण संस्था, अंत्रीतेली रजि.नं. एफ-४५३६ (बुलडाणा)

द्वारा संचालित

"Shivraj is a Movement of Equality & Sustainable Development"

Certificate No. : 2309023201K/QMS

# संत गाडगेबाबा कनिष्ठ महाविद्यालय

कला, वाणिज्य व विज्ञान (क्रॉप सायन्स)

(अंशतः अनुदानित)

साखळी बु., ता. जि. बुलडाणा

## माहिती पुस्तिका

## २०२३-२४

web-shivrajshikshansanstha.org
Email :- shivrajshikshansanstha1@gmail.com

• प्रकाशन •

प्राचार्य

संत गाडगेबाबा कनिष्ठ महाविद्यालय,
साखळी बु., ता. जि. बुलडाणा

|| विद्या परम् दैवतं ||

# शिवराज शिक्षण संस्था, अंत्रीतेली

## ❋ संचालक मंडळ ❋

| नाव | पद |
|---|---|
| श्री. नरेश राजाराम शेळके | अध्यक्ष |
| श्री. रविंद्र कृष्णराव भुसारी | उपाध्यक्ष |
| श्री. दत्तात्रय फकिरा डुकरे | सचिव |
| श्री. सतिष राजाराम शेळके | सहसचिव |
| श्री. पांडूरंग फकिरा डुकरे | कोषाध्यक्ष |
| सौ. कांताबाई राजाराम शेळके | सदस्या |
| सौ. रंजना प्रकाश रिंढे | सदस्या |



**नरेश शेळके**
**अध्यक्ष, शिवराज शिक्षण संस्था, अंत्रीतेली**
**तथा मा. सदस्य, जि.प. बुलडाणा.**
**मो. 9822471023**

## - मनोगत -

सामाजिक व सांस्कृतिक वारसा लाभलेल्या साखळी बु. या गावामध्ये शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवल्यागेली परंतु ती इयत्ता १० पर्यंतच मर्यादीत राहिली. दुर्देवाने उच्चमाध्यमिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध झाली नाही. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना (विशेष करून मुलींना) शिक्षणापासून वंचित रहावे लागत होते. ही बाब मनाला बोचत असल्याने तथा नागरीकांच्या सतत असणाऱ्या मागणीचा विचार करून यातून मार्गकाढण्याच्या दृष्टीने साखळी बु. ता. जि. बुलडाणा येथे शिवराज शिक्षण संस्थेने गाडगे महाराजांच्या कार्यातून प्रेरणा घेवून "संत गाडगेबाबा कनिष्ठ महाविद्यालय" जून २००९ - १० या सत्रापासून सुरू करण्यात आले आहे. संस्थेची **टॅग लाईन** प्रमाणे Equality & Sustainable Development वर आधारीत कार्य चालू आहे. सन २०२२-२३ या शैक्षणिक सत्रामध्ये इयत्ता १२ वीचा कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के दिला असून नेहमीसाठी निकालाची परंपरा उत्कृष्ट राखण्याच्या दृष्टीने संस्था सतत प्रयत्नशील राहील.

गुणवत्तापुर्ण व दर्जेदार शिक्षण देण्याचा आमचा भर राहील. तसेच पालकांच्या खास आग्रहास्तव सन २०१८-१९ पासून **विज्ञान** शाखा सुरू केली असून २०१९-२० पासून विज्ञान शाखेत पिकशास्त्र विषय सुरू केला आहे. परिसरातील मुलामुलींनी याचा लाभ घेवून उच्च शिक्षण संपादन करून आपल्या जीवनातील बदलासोबतच सुसंस्कृत भारताच्या जोपासनेत भर टाकावी, परिसराचे व गावाचे नांव उज्वल करावे, ही अपेक्षा.

# शुभेच्छा संदेश



प्रति,

**मा. प्राचार्य तथा समस्त प्राध्यापकवृंद**
**संत गाडगेबाबा कनिष्ठ महाविद्यालय,**
**साखळी बु||**

आपण आपल्या महाविद्यालयामध्ये शैक्षणिक सत्र सन २०२२-२३ या शैक्षणिक सत्रामध्ये इयत्ता १२ वीचा कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के असून विद्यार्थ्यांनी शिक्षण संस्थेचे व महाविद्यालयाचे नाव उज्वल केले आहे. सर्वच प्राध्यापक वृंदाच्या कठोर परिश्रमातून हे यश समोर आले आहे.

भविष्यामध्ये आपल्या महाविद्यालयाची अशीच प्रगती होवो. आपल्या महाविद्यालयातून देशाच्या भावी पिढीला सक्षम व सुसंस्कारीक नागरीक मिळण्यास हार्दीक व प्रांजळ शुभेच्छा !

*धन्यवाद !*

*आपली स्नेहांकित*

Shelke

दि. २७/६/२०२३

**सौ. लक्ष्मी नरेश शेळके**
**मा. सभापती,**
**कृषी व पशुसंवर्धन विभाग,**
**जि.प.बुलडाणा**

# - मनोगत -

प्रिय, विद्यार्थी मित्र मैत्रिनींनो,

कोणत्याही राष्ट्राचा विकास हा त्या राष्ट्रातील नागरीकांवर अवलंबून असतो, असे सुजान, चारित्र्य संपन्न, सुसंस्कृत, प्रतिभावान, कर्तृत्ववान, कर्तव्यनिष्ठ आदर्श नागरीक निर्माण करणे हे शिक्षणाचे मुलभुत उद्दिष्ट आहे. याकरीता शिक्षणाचा प्रसार शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागातही झपाट्याने होत असल्याचे आपल्या निदर्शनास येत असले तरीही, आजही ग्रामीण क्षेत्रामध्ये उच्च शिक्षणाच्या संधी पाहिजे त्या प्रमाणात उपलब्ध होत नसल्याने व आर्थिक विवंचनेमुळे दुरवर उच्चशिक्षणाकरीता जावू शकत नसल्याने ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी माध्यमिक शिक्षणापलिकडे शिक्षण घेवू शकत नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी उच्चशिक्षणापासून वंचित राहत असल्याचे निदर्शनास येत आहे.

सदर समस्या जाणून शिवराज शिक्षणसंस्था अंत्रीतेली चे संस्थापक अध्यक्ष श्री नरेशभाऊ शेळके यांच्या अथक प्रयत्नातून आपल्या परिसरातील प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्ता पुर्वक दर्जेदार उच्च शिक्षणाची संधी प्राप्त व्हावी व राष्ट्र विकास उपयोगी आदर्श नागरीक निर्माण व्हावे या एकमेव ध्येय्याने शैक्षणिक सत्र २००८ - ०९ मध्ये साखळी बु. येथे "संत गाडगेबाबा कनिष्ठ महाविद्यालय" या महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली.

महाविद्यालयाच्या स्थापनेला १५ वर्षे पुर्ण झाले असून या १५ वर्षात विद्यार्थी आणि पालकांचा महाविद्यालयाकडील वाढता कल लक्षात घेवून तसेच विद्यार्थी आणि पालकांच्या आग्रहास्तव संस्थेने महाविद्यालयात शैक्षणिक सत्र सन २०१८ - १९ या वर्षापासून विज्ञान शाखा सुरू केली असुन वर्ग ११ व १२ वी करीता प्रवेश देणे सुरु आहे. सदर महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच विद्यार्थीनी कोणत्याही क्षेत्रात मागे नाहीत महाविद्यालयाच्या विकासासाठी महाविद्यालयीन व्यवस्थापन, विद्यार्थी, पालक, प्राध्यापक आणि कर्मचारी यांचे अथक परिश्रमाची अवश्यकता असते. त्याकरीता महाविद्यालयातील कोणताही घटक कमी पडणार नाही याची मला शास्वती आहे.

धन्यवाद !



**प्रा. अंजली गंजीधर गाढे**
**प्राचार्य**
**संत गाडगेबाबा कनिष्ठ महाविद्यालय,**
**साखळी बु., ता. जि. बुलडाणा**
**मो. 9421464305**

# महाविद्यालयीन कर्मचारी वृंद

**प्राचार्य, अंजली गाढे,** मो. 8788755193

**प्रा. डि. एन. आमले**
मो. 7066167969

**प्रा. के. एल. इंगळे**
मो.8446251340

**श्री. आर. एस. जगताप** (क. लिपीक)
मो. 9309197463

**श्री. ए. के. साखळीकर**
मो. 8390143493

# कनिष्ठ महाविद्यालयाची वैशिष्टे

- कॉलेजच्या प्रारंभीच्या दिवसापासुन नियमित वर्ग व अतिरिक्त क्लासेस.
- इयत्ता १२ वी च्या पाच सराव परिक्षा घेऊन विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत प्रत्येक पालकांना पालक मेळाव्याद्वारे पालकांशी संवाद.
- कनिष्ठ महाविद्यालयातुन प्रत्येक शाखेच्या पहिल्या तीन विद्यार्थ्यांच्या संस्थेच्या व मान्यवरांच्या वतीने प्रत्यक्ष घरी जावून पालकांसह विद्यार्थ्यांचा सदोचित सत्कार.
- गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात मान्यवरांच्या हस्ते संस्थेच्यों वतीने सन्मानचिन्ह देवून विशेष गौरविण्यात येते.
- परिसरातील विशेष उल्लेखनिय काम करणाऱ्या व्यक्तींचा संस्थेच्या वतीने सत्कार.
- विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती, सामाजिक आपुलकी, चारित्र्य संपन्नता निर्माण व्हावी,अंधश्रध्दा निर्मुलन, परिश्रम व चिकाटीची भावना निर्माण व्हावी. आरोग्य, वाचन, खिलाडु वृत्ती, श्रमदान, नाट्य व क्रिडा वकृत्व व नेतृत्व, शैक्षणिक सहल, पर्यावरण व स्वच्छतेचे महत्व इ. बाबींवर विशेष भर देवून कार्यक्रम आयोजित केल्या जातात.

## अभ्यासक्रम

या कनिष्ठ महाविद्यालयात कला, वाणिज्य व विज्ञान शाखा असुन प्रत्येक शाखेत नमुद केल्याप्रमाणे विषय शिकविण्याची सुविधा आहे.

**गट अ) कला शाखा (मराठी माध्यम) आवश्यक विषय :-**

१) इंग्रजी २) मराठी ३) पर्यावरण ४) शारिरिक शिक्षण

**गट ब) ऐच्छिक विषय :-** १) इतिहास २) स.शास्त्र ३) अर्थशास्त्र ४) सहकार

**गट अ) वाणिज्य शाखा (मराठी माध्यम) आवश्यक विषय :-**

१) इंग्रजी २) मराठी ३) पर्यावरण ४) शारिरिक शिक्षण

**गट ब) ऐच्छिक विषय :-** १) अर्थशास्त्र २)सहकार ३) पुस्तपालन व लेखाकर्म ४) वाणिज्य संघटन व व्यवस्थापन

**गट अ) विज्ञान शाखा :- आवश्यक विषय :-**

१) इंग्रजी २) पर्यावरण ३) शारिरिक शिक्षण

**गट ब) ऐच्छिक विषय :-** १) मराठी २) जिवशास्त्र ३) भौतिकशास्त्र ४) रसायनशास्त्र ५) गणित ६) पिकशास्त्र

## कनिष्ठ महाविद्यालयाविषयी थोडक्यात

१) ३० जुन २०२३ ला सकाळी ७.३५ पासुन नियमित वर्ग सुरु होतील.

२) ३० जुन २०२३ ला सकाळी ९.०० वाजता वर्ग १२ वी च्या विद्यार्थ्यांनी प्रा. प्राचार्य मार्गदर्शन करतील. वर्ग ११ उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांनी यासाठी उपस्थित राहणे अनिवार्य राहील.

३) कॉलेज भरण्याची वेळ सोमवार ते शनिवार सका.७.३० ते ११.३० पर्यंत राहील.

४) कॉलेजमध्ये सकाळी :- प्रार्थना - राष्ट्रगीत - निवडक सुविचार

५) कनिष्ठ महाविद्यालयात सर्व प्रकारचे खेळ व क्रीडांबाबत व्यवस्था करण्यात आली आहे.

## स्वाध्याय व परीक्षा

प्रत्येक वर्षात दोन सत्र परीक्षा घेतल्या जातील. प्रथम सत्र परीक्षा दिवाळी पूर्वी व द्वितीय सत्र परीक्षा मार्च / एप्रिल दरम्यान घेतल्या जातील. ह्या शिवाय वर्षभरात प्रत्येक विषयाच्या घटक चाचण्या घेतल्या जातील. घटक चाचण्या, प्रथम सत्र परीक्षा व द्वितीय सत्र परीक्षा यांची सरासरी काढून वर्ग ११ वी चा निकाल लावण्यात येईल. वर्ग १२ मध्ये घटक चाचण्या, प्रथम सत्र परीक्षा व सराव परीक्षा होतील. सर्व परीक्षांना उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

# शैक्षणिक सत्र २०२३ - २०२४

## प्रथम सत्र ३०.६.२०२३ ते दिवाळी सुटी

## द्वितीय सत्र दिवाळी सुटीनंतर ३०/४/२०२४ पर्यंत

# विद्यार्थ्यांसाठी महत्वाच्या सुचना

१) प्रवेशासाठी अर्जाचा नमुना व माहिती पत्रक कनिष्ठ महाविद्यालयाचे कार्यालयीन वेळात इयत्ता १० वी चा निकाल लागल्यानंतर लगेच विक्रीस उपलब्ध आहे.

२) प्रवेश अर्जासोबत आवश्यक दाखले, प्रमाणपत्रे जोडून व सर्व माहिती काळजीपूर्वक भरुन प्रवेश अर्ज मुदतीत कार्यालयात सादर करावा.

३) कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांने गणवेषात येणे आवश्यक आहे.

४) कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्याने मोबाईल आणू नये. आणल्यास जप्त केला जाईल. वारंवार मोबाईल आणणाऱ्यास हजेरी पटावरून कमी करण्यात येईल.

५) सर्व विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक तासिकेला गणवेषात हजर रहावे लागेल. गणवेषात हजर न राहील्यास तासिकेला तसेच कनिष्ठ महाविद्यालयातर्फे घेण्यात येणाऱ्या परीक्षांना बसण्याची परवानगी दिली जाणार नाही व अशा विद्यार्थ्यांस संपूर्ण दिवस अनुपस्थित समजण्यात येईल.

६) वर्गात नियमित हजर राहण्यासंबंधी दक्षता बाळगावी. कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्यांस कनिष्ठ महाविद्यालयाचे नियम पाळणे बंधनकारक राहील.

७) कनिष्ठ महाविद्यालयीन मालमत्तेची कोणत्याही प्रकारे नासधूस करता कामा नये. नुकसान केल्यास भरपाई घेतल्या जाईल व दंडाची रक्कम परत केली जाणार नाही.

८) विद्यार्थ्यांनी वर्गातील वागणूक इतर विद्यार्थ्यांना त्रासदायक होणार नाही याबाबत प्रत्येक विद्यार्थ्याने खबरदारी घ्यावी. वागणूक समाधानकारक नसल्यास त्या विद्यार्थ्याला कॉलेजमधून तात्काळ काढून टाकण्यात येईल.

९) प्राचार्यांच्या परवानगीशिवाय शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाच्या आवारात कसल्याही प्रकारचे कार्यक्रम, सभा इ. घेता येणार नाही.

१०) कामाशिवाय प्राचार्यांचा कक्षात / कार्यालयात तसेच शिक्षक कक्षात कोणीही प्रवेश करु नये अथवा कार्यालयातून ये-जा करु नये.

११) वर्ग सुरु असतांना विद्यार्थ्यांनी वर्गामध्येच उपस्थित राहणे अनिवार्य आहे. व्हरांड्यात अथवा मैदानात इकडे - तिकडे फिरु नये अथवा मोठ्याने बोलू नये.

# परीक्षा व उपस्थिती

विभागीय मंडळाच्या परीक्षेखेरीज कनिष्ठ महाविद्यालयाची प्रथमसत्र परीक्षा साधारणत: दिवाळीच्या सुट्टीपुर्वी आणि द्वितीयसत्र परीक्षा जानेवारी महिन्यात घेतली जाते. ह्या परीक्षांना हजर राहणे आवश्यक आहे. गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल. आजारी असल्यास शल्य चिकित्सकांचे प्रमाणपत्र आणावे लागेल. शैक्षणिक सत्रात घटक चाचण्यांना व परीक्षकांना उपस्थित राहणे अनिवार्य आहे. कनिष्ठ महाविद्यालयात कोणत्याही परीक्षेत / चाचणीस गैरहजर राहिल्यास निकाल रोखण्यात येईल.

बोर्डाच्या परिक्षेसाठी विद्यार्थ्यांची प्रत्येक विषयातील व प्रत्येक सत्रातील उपस्थिती ७५ % अनिवार्य असून प्रगती व वर्तणुक समाधानकारक असणे आवश्यक आहे. उपस्थिती कमी असल्यास तसेच प्रगती व वर्तणुक समाधानकारक नसल्यास वार्षिक परीक्षेला बसण्याची परवानगी दिली जाणार नाही. तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांला शिष्यवृत्ती मिळणार नाही.

## मागील शाळा सोडण्याचा दाखला (टि.सी.) :-

कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर कोणत्याही कारणास्तव प्रवेशासोबत दिलेला मुळ शाळा सोडण्याचा दाखला (टि.सी.) परत दिला जाणार नाही. विद्यार्थ्यांना आवश्यकता वाटल्यास त्यांनी दाखल्यांच्या जास्तीच्या झेरॉक्स प्रती काढून घ्याव्यात.

# विद्यार्थ्यांची वर्तणूक

संस्थेतील मालमत्तेचा काळजीपुर्वक वापर करावा. विद्यार्थ्यांने वर्गातील फर्निचर, ग्रंथलयातील पुस्तके, प्रयोग शाळेतील साहित्य, इ. संस्थेच्या मालमत्तेचे नुकसान केल्यास दंड आकारण्यात येईल. गैरवर्तन करणाऱ्या विद्यार्थ्यांने नांव हजेरी पटावरून कमी करुन टि.सी. व तशी नोंद केली जाईल.

# पालकांस सुचना

१) विद्यार्थी शिस्तीमध्ये वागणार असेल तरच पालकांनी आपल्या पाल्याचा प्रवेश निश्चित करावा.

२) विद्यार्थ्याच्या संपुर्ण नावातील काही बदल, जातीमधील, जन्मदिनांकामधील बदल असल्यास दुरुस्त करण्यासाठी प्रस्ताव पालकाने प्रवेश घेतल्या पासून तीन महिन्याचे आत शाळेकडे सादर करणे आवश्यक आहे.

# शैक्षणिक सत्रामध्ये साजरे होणारे कार्यक्रम

| अ.क्र. | कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| १) | सामाजिक कल्याण दिन राजर्षी छ. शाहू महाराज जयंती | २६/६/२०२३ |
| २) | लोकमान्य टिळक जयंती | २३/७/२०२३ |
| ३) | अण्णाभाऊ साठे जयंती | १/८/२०२३ |
| ४) | स्वातंत्र्य दिन | १५/८/२०२३ |
| ५) | शिक्षक दिन | ५/९/२०२३ |
| ६) | महात्मा गांधी जयंती व जागतिक अंहिसा दिन | २/१०/२०२३ |
| ७) | लाल बहाद्दुर शास्त्री जयंती | २/१०/२०२३ |
| ८) | पं. नेहरू जयंती - बालक दिन | १४/११/२०२३ |
| ९) | सावित्रीबाई फुले जयंती | ३/१/२०२४ |
| १०) | राजमाता जिजाऊ जन्मोत्सव, स्वामी विवेकानंद जयंती व राष्ट्रीय युवक दिन | १२/१/२०२४ |
| ११) | छत्रपती शिवाजी महाराज जयंती | १९/२/२०२४ |
| १२) | प्रजासत्ताक दिन | २६/१/२०२४ |
| १३) | जागतिक महिला दिन | ८/३/२०२४ |
| १४) | जागतिक आरोग्य दिन | ७/४/२०२४ |
| १५) | महात्मा ज्योतीबा फुले जयंती | ११/४/२०२४ |
| १६) | डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती | १४/४/२०२४ |
| १७) | महाराष्ट्र दिन | १ /५/२०२४ |
| १८) | छ. राजर्षी शाहू महाराज स्मृतिदिन | ६/५/२०२४ |
| १९) | म. शासनाने निर्देशित केलेले उपक्रम | |



मा.विशाल नरवाडे सर (IAS) यांना सन्मानित करतांना
मा. लोखंडे सर (Ad.CEO. ZP. Buldana),
मा. मेरत सर (समाज कल्याण अधिकारी, जि.प. बुलढाणा)
मा. राजाराम शेळके व संस्थाध्यक्ष मा. नरेशभाऊ शेळके





मा. विनोद गायकवाड (वित्त व लेखा अधिकारी, जि.प. बुलढाणा),
मा.डॉ. मारोती चाटे (स्त्रिरोग तज्ञ, बुलडाणा),
गुणवंत विद्यार्थी व इतर मान्यवर




मार्गदर्शन करतांना मा. नरेशभाऊ शेळके,
मा. प्रल्हाद काटकर (ठाणेदार, शहर पो.स्टे. बुलडाणा)
व इतर मान्यवर